केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी उपयोजनेसाठी सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून SNA SPARSH प्रणालीद्वारे प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) याकरीता केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% साठी पुनर्विनियोजनद्वारे निधी वितरीत करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४४/आ.कक्ष/ (सं.क्र. ई-१७७७१५१)
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) केंद्र शासनाचे मंजूरी आदेश क्र. G.२७०१७/२१/२०२६-२७/NHM, दि.०७.०७.२०२६.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०२६/प्र.क्र.६१/अर्थ -३ दि.०३.०७.२०२६
५) संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/ एफएमजी/ के.रा.हि/८७३३४-३४०/२०२६-२७ दिनांक १०.०७.२०२६
६) आदिवासी विकास विभाग, शासन ज्ञापन क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.७०/का-६, दिनांक १३.०८.२०२६
७) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.०५/का-६, दिनांक १३.०८.२०२६

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी उपयोजनेकरिता प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान या योजनेसाठी केंद्र हिस्स्याकरीता लेखाशिर्ष २२१०K६९६, बाब ३१ सहायक अनुदाने वेतनेतर आणि बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता तसेच राज्य हिस्स्याकरीता लेखा शिर्ष २२१०K७०२, बाब ३१ सहायक अनुदाने वेतनेतर, बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी उपयोजनेकरिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून पुनर्विनियोजनाव्दारे निधी राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वर प्रस्तावनेमध्ये नमुद केलेली बाब विचारात घेता, वाचा मधील अनुक्रमांक - ५ येथील दिनांक १०.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी उपयोजनेकरिता प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान या योजनेसाठी केंद्र हिस्स्याकरीता लेखाशिर्ष २२१०K६९६, बाब ३१ सहायक

अनुदाने वेतनेतर आणि बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता तसेच राज्य हिस्स्याकरीता लेखा शिर्ष २२१०K७०२, बाब ३१ सहायक अनुदाने वेतनेतर, बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी उपयोजनेकरिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून पुनर्विनियोजनाव्दारे खालीलप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीस निधी वितरित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर योजनेवरील खर्च खालील प्रमाणे नमुद लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजुर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा.

(रु.लाखात)

अ. क्र	तपशिल	केंद्र हिस्सा / राज्य हिस्सा		
		लेखाशिर्ष	सन २०२६-२७ (मूळ तरतूद)	वितरीत रक्कम केंद्र) व राज्य हिस्सा ६०% व ४०%)
	मागणी क्र टी-५, आदिवासी विकास विभाग २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६, सार्वजनिक आरोग्य, ७९६ अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१)(४८) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएमकेंद्र) (जनमन- ६० हिस्सा%(कार्यक्रम) (, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०K६९६-३१	०.०१	(+)२७४.००
	३५ निर्मितीकरिता च्याभांडवली मत्ते- अनुदान	२२१०K६९६-३५	०.०१	(+)३१.००
	आदिवासी विकास विभाग मागणीक्र टी.-५, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०३, ग्रामीण आरोग्य सेवा-विषमचिकित्सा, ७९६,अनुसूचित जमातींसाठी विकास	२२१०F७३८-३१	२३२२०.१५	(-)२७४.००

	कृती योजना (०१)जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१)(०४) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (कार्यक्रम) (टक्के ६० केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)			
	३५ निर्मितीकरिता च्याभांडवली मत्ते- अनुदान	२२१०F७३८-३५	२५८०.०२	(-)३१.००
	मागणी क्र टी-५, आदिवासी विकास विभाग २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६, सार्वजनिक आरोग्य, ७९६ अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१)(४९) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-४० हिस्साराज्य) (जनमन%(कार्यक्रम) (, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०K७०२-३१	०.०१	(+)१८२.६७
	३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता	२२१०K७०२-३५	०.०१	(+)२०.६७
	आदिवासी विकास विभाग मागणीक्र टी.-५, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६, सार्वजनिक आरोग्य, ७९६ ,अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना जनजाति क्षेत्र उपयोजना (०१), (०१)(१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानना संस्थां आरोग्यराज्य -(टक्के ४० हिस्साराज्य) अनुदानसहायक (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०E४५५-३१	१५४८०.१०	(-)१८२.६७
	३५ निर्मितीकरिता च्याभांडवली मत्ते- अनुदान	२२१०E४५५-३५	१७२०.०१	(-)२०.६७

०३. सदरचा खर्च केंद्र लेखाशिर्ष २२१०K६९६ व राज्य लेखाशिर्ष २२१०K७०२ अंतर्गत सन २०२६-२७ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा.

०४. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करुन विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटीच्या यांच्याकडे सूपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०५. वित्त विभागाच्या दिनांक ०९ एप्रिल, २०२६ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.९ मधील मुद्दा क्र.१ ते ९ मधील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६, दि. ०७.०५.२०२६ व दि. ०३.०७.२०२६ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र. १ ते ९ मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

०६. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखा परिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप नसल्याचे राज्य आरोग्य सोसायटीने प्रमाणित केलेले आहे.

०७. सदर योजनेवरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या/लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा होणार आहे.

०८. सदर योजनेवरील वितरीत करण्यात येणारा निधी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य हे सन २०२३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अंतर्गत दिनांक १७-०३-२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिनियमास अनुसरून महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणा मार्फत खरेदी करावयाची असल्याने योजनेचा निधी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणच्या बँक खात्यामध्ये वळते करून आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य खरेदी करण्यात येईल.

०९. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी भारतीय रिझर्व्ह बँक द्वारे खर्च करण्यात येतो. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित

असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे तसेच सदरहू निधी राज्य आरोग्य सोसायटी किंवा ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.

१०. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निधी वितरण करण्यात येत आहे.

११. सदर कार्यक्रमाचा निधी SNA SPARSH प्रणालीद्वारे RBI च्या E-Kuber मार्फत वितरीत करावयाचा असल्याने सदरचे अनुदान बिनशर्त आहे.

१२. सदरचा शासन निर्णय वाचामधील अनु क्रमांक - २, ३ व ४ येथील अनुक्रमे दिनांक ०९.०४.२०२६, दि. ०७.०५.२०२६ व दि.०३.०७.२०२६ मध्ये वित्त विभागाने वेळोवेळी दिलेले निर्देश, त्याचप्रमाणे वित्त विभागाने ई ऑफिस क्र. १७७७१५१, पृ.क्र. १८-२३/ टि.वि. वर दिनांक ०७.०८.२०२६ अन्वये दिलेली मान्यता तसेच वाचा मधील अनुक्रमांक ६ व ७ येथील दिनांक १३.०८.२०२६ रोजीच्या ज्ञापन व शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१७११४६५४२३१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKAS TULSHIRAM KADAM

Digitally signed by VIKAS TULSHIRAM KADAM
DN: cn=VIKAS TULSHIRAM KADAM, o=PUBLIC HEALTH DEPARTMENT, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, email=vikas.kadam@nic.in, c=IN
Date: 2026.08.17 11:56:26 +05'30'

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.

५. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे.
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७. अति. संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प/व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव, (अर्थसंकल्प व लेखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (आदिवासी कक्ष).